# सार्वजनिक प्राधिकरणांना उत्तरदायी ठरवण्यासाठी माहितीचा अधिकार

## शब्दावली

- **केंद्रीय माहिती आयोग:-** माहितीचा अधिकार अधिनियमाच्या कलम २(ख) अन्वये व्याख्या. केंद्रीय माहिती आयोग हे केंद्र सरकारच्या अधीन सार्वजनिक प्राधिकरणांशी संबंधित तक्रारी आणि अपीलांवर कार्यवाही करण्यास सक्षम प्राधिकरण आहे.
- **माहिती:-** कलम २(च) अन्वये कोणत्याही स्वरुपातील कोणतेही साहित्य, ज्यामध्ये अभिलेख, दस्तऐवज, ज्ञापने, ई-मेल, अभिप्राय, सूचना, प्रसिद्धीपत्रके, परिपत्रके, आदेश, रोजवह्या, संविदा, अहवाल, कागदपत्रे, नमुने, प्रतिमाने (मॉडेल), कोणत्याही इलेक्ट्रॉनिक स्वरुपातील आधारसामग्री आणि त्या त्या वेळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यांवये सार्वजनिक प्राधिकरणास मिळवता येईल अशी कोणत्याही खाजगी निकायाशी संबंधित माहिती यांचा समावेश होतो.
- **सार्वजनिक प्राधिकरण:-** कलम २(ज) अन्वये सार्वजनिक प्राधिकरण याचा अर्थ, --

    *क. संविधानाद्वारे किंवा तदन्वये;*

    *ख. संसदेने तयार केलेल्या कोणत्याही अन्य कायद्याद्वारे;*

    *ग. राज्य विधानमंडळाने तयार केलेल्या कोणत्याही अन्य कायद्याद्वारे;*

    *घ. समुचित शासनाने काढलेल्या अधिसूचनेद्वारे किंवा आदेशाद्वारे स्थापन करण्यात आलेले किंवा घटित करण्यात आलेले कोणतेही प्राधिकरण किंवा निकाय किंवा स्वराज्य संस्था, असा आहे आणि त्यामध्ये,*

        *(एक) समुचित शासनाची मालकी असलेला, त्याचे नियंत्रण असलेला किंवा त्याच्याकडून निधीद्वारे ज्याला प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे मोठ्या प्रमाणात वित्त पुरवठा केला जातो असा निकाय;*

        *(दोन) समुचित शासनाकडून निधीद्वारे जिला प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे मोठ्या प्रमाणात वित्त पुरवठा केला जातो, अशी आशासकीय संघटना, यांचा समावेश होतो.*

- **माहितीचा अधिकार:-** *माहितीचा अधिकार याचा अर्थ, कोणत्याही सार्वजनिक प्राधिकरणाकडे असलेली व या अधिनियमान्वये मिळवता येण्याजोगी माहिती मिळवण्याचा अधिकार, असा आहे आणि त्यामध्ये:-*

    *(एक) एखादे काम, दस्तऐवज, अभिलेख यांची पाहणी करणे;*

    *(दोन) दस्तऐवजांच्या किंवा अभिलेखांच्या टिपण्या, उतारे किंवा प्रमाणित प्रति घेणे;*

    *(तीन) सामग्रीचे प्रमाणित नमुने घेणे;*

    *(चार) डिस्केट, फ्लॉपी, टेप, व्हिडीओ कॅसेट या स्वरूपातील किंवा कोणत्याही अन्य इलेक्ट्रॉनिक प्रकारातील माहिती किंवा जेव्हा अशी माहिती संगणकात किंवा अन्य कोणत्याही उपकरणात साठवलेली असेल त्याबाबतीत मुद्रित प्रती (प्रिंटआऊट) मार्फत माहिती मिळवणे; यांबाबतच्या अधिकाराचा समावेश होतो.*

- **राज्य माहिती आयोग:-** माहितीचा अधिकार अधिनियमाच्या कलम २(ख) अन्वये व्याख्या. राज्य माहिती आयोग हे राज्य सरकारच्या अधीन सार्वजनिक प्राधिकरणांशी संबंधित तक्रारी आणि अपीलांवर कार्यवाही करण्यास सक्षम प्राधिकरण आहे.

## १. पार्श्वभूमी

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चा उद्देश सार्वजनिक प्राधिकरणांकडून मागवलेली माहिती मिळवून देणे असा आहे. माहितीचा अधिकार अधिनियमाच्या कलम २ (च) अन्वये माहितीची व्याख्या करण्यात आलेली आहे तर कलम २(ज) अन्वये सार्वजनिक प्राधिकरण याची व्याख्या करण्यात आलेली आहे. संबंधित कलमे खाली पुनरुक्त केलेली आहेत:-

*कलम २(च):- 'माहिती' याचा अर्थ कोणत्याही स्वरुपातील कोणतेही साहित्य, ज्यामध्ये अभिलेख, दस्तऐवज, ज्ञापने, ई-मेल, अभिप्राय, सूचना, प्रसिद्धीपत्रके, परिपत्रके, आदेश, रोजवह्या, संविदा, अहवाल, कागदपत्रे, नमुने, प्रतिमाने (मॉडेल), कोणत्याही इलेक्ट्रॉनिक स्वरुपातील आधारसामग्री आणि त्या त्या वेळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यांवये सार्वजनिक प्राधिकरणास मिळवता येईल अशी कोणत्याही खाजगी निकायाशी संबंधित माहिती यांचा समावेश होतो.*

*कलम २(ज):- 'सार्वजनिक प्राधिकरण' याचा अर्थ, --*

*क. संविधानाद्वारे  किंवा तदन्वये;*

*ख. संसदेने तयार केलेल्या कोणत्याही अन्य कायद्याद्वारे;*

*ग. राज्य विधानमंडळाने तयार केलेल्या कोणत्याही अन्य कायद्याद्वारे;*

*घ. समुचित शासनाने काढलेल्या अधिसूचनेद्वारे किंवा आदेशाद्वारे स्थापन करण्यात आलेले किंवा घटित करण्यात आलेले कोणतेही प्राधिकरण किंवा निकाय किंवा स्वराज्य संस्था, असा आहे आणि त्यामध्ये,*

*(एक) समुचित शासनाची मालकी असलेला, त्याचे नियंत्रण असलेला किंवा त्याच्याकडून निधीद्वारे ज्याला प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे मोठ्या प्रमाणात वित्त पुरवठा केला जातो असा निकाय;*

*(दोन) समुचित शासनाकडून निधीद्वारे जिला प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे मोठ्या प्रमाणात वित्त पुरवठा केला जातो, अशी अशासकीय संघटना, यांचा समावेश होतो.*

## २. सार्वजनिक प्राधिकरणांना उत्तरदायी कसे ठरवावे?

अर्जदारांनी सार्वजनिक प्राधिकरणांना उत्तरदायी ठरवण्यासाठी माहितीचा अधिकार अधिनियम प्रभावीपणे आणि कार्यक्षमपणे वापरल्याची अनेक पूर्ववर्ती उदाहरणे आहेत. खाली दिलेला अशा काही प्रकरणांचा गोषवारा सार्वजनिक प्राधिकरणांना कसे जबाबदार आणि उत्तरदायी बनवता येते हे समजून घेण्यासाठी उपयुक्त आहे:-

क. टीके श्रीजित विजय या अंदमान बेटांवर पोर्ट ब्लेअर येथे राहणाऱ्या शालेय विद्यार्थ्याच्या प्रयत्नामुळे त्याच्या परिसरातील रस्त्यांची दुरुस्ती झाली. टीके श्रीजित विजय हा अंदमान आणि निकोबार बेटे केंद्रशासित प्रदेशातील सर्वात कमी वयाचा माहिती अधिकार वापरकर्ता देखील ठरला.

माहितीचा अधिकार वापरून सार्वजनिक प्राधिकरणांना रस्ते, स्वच्छतागृहे, उद्याने इत्यादींच्या देखरेखीबाबतचे सार्वजनिक प्राधिकरणांचे उत्तरदायित्व निर्धारित करता येते हे या प्रकरणात निदर्शनास आले.

ख. सन २०११ मध्ये आपल्या परिसरातील रास्त दर दुकानाच्या कार्याबाबत असमाधानी असल्याने एका महाविद्यालयीन विद्यार्थ्याने स्थानिक तहसीलदाराकडे त्याच्या गावातील रास्त दर दुकानाला तत्पूर्वीच्या सहा महिन्यांच्या कालावधीत दरमहा केलेल्या पुरवठ्याबाबत माहिती मागितली. दारिद्र्यरेषेखालील लोकांसाठीच अन्नधान्य इतरत्र वळवून तो दुकानदार कसा नफेखोरी करत होता हे तहसीलदाराने केलेल्या तपासणीत लक्षात आले.

सार्वजनिक प्राधिकरणाचे त्यांचा निधी आणि अन्नधान्याच्या संदर्भातील उत्तरदायित्व कसे निर्धारित करता येईल हे या प्रकरणातून निदर्शनास आले. या प्रकरणाची दखल घेत गुजरातच्या राज्य माहिती आयोगाने संबंधित शासकीय खात्यांना सर्व रास्त दर दुकानांना केलेला पुरवठा पुढाकार घेत प्रकट करण्याचे आदेश दिले.

ग. लखनौ, उत्तर प्रदेश येथे एका शालेय विद्यार्थिनीने माहितीच्या अधिकाराखालील अर्ज दाखल केल्यानंतर तिच्या परिसरातील तुंबलेली कचराकुंडी साफ करण्यात आली. तिचा अर्ज प्राप्त झाल्यावर लखनौ महानगरपालिकेने ती जागा लवकरच साफ करण्यात येईल असे उत्तर दिले, आणि यथावकाश तेथे वाचनालय देखील उभारण्यात आले.

हे प्रकरण माहितीचा अधिकार वापरून महानगरपालिका, नगरपालिका यासारख्या स्थानिक संस्थाचे उत्तरदायित्व देखील कसे निर्धारित करता येते याचे उदाहरण आहे.

घ. एका विचाराधीन बंद्याच्या पत्नीने फौजदारी न्याय यंत्रणेच्या संदर्भात माहितीच्या अधिकाराचा प्रभावी वापर केला. या महिलेच्या पतीच्या विरुद्धच्या खटल्याची सुनावणी प्रलंबित असताना त्याला डोक्यावर जखमा झाल्यामुळे तातडीने रुग्णालयात न्यावे लागले होते. रुग्णालयात पोहोचल्यावर त्याला आणताक्षणी मयत जाहीर करण्यात आले होते. या महिलेने वैद्यकीय अहवाल (मेडिकल रिपोर्ट), शवविच्छेदन अहवाल (पोस्ट मॉर्टेम रिपोर्ट) आणि प्रथम खबर अहवाल (एफआयआर) यांच्या प्रति मिळण्याकामी माहितीच्या अधिकाराखाली अर्ज सादर केला. यथावकाश तिला न्यायालयाकडून नुकसानभरपाई मिळवणे शक्य झाले.

माहितीचा अधिकार अधिनियम फौजदारी न्याय यंत्रणेच्या संदर्भात कसा उपयुक्त ठरू शकतो याचे हे महत्वपूर्ण पूर्ववती उदाहरण आहे.

**३. माहितीचा अधिकार वापरून सार्वजनिक प्राधिकरणांमधील पारदर्शकता, उत्तरदायित्व आणि जबाबदारीची जाणीव याबाबत खबरदारी घेणे कसे शक्य आहे?**

क. गैरशासकीय संस्थांमधील गैरव्यवहार उघडकीस आणून;

ख. ग्रामसभा आणि ग्रामपंचायत यासारख्या स्थानिक संस्थांच्या बैठकीतील चर्चांची माहिती मिळवून;

ग. पारपत्र, आधार कार्ड, वाहन चालक परवाना, पॅन कार्ड अशा ओळख पटवणाऱ्या वेगवेगळया कागदपत्रांच्या स्थितीबाबत माहिती मिळवून;

घ. संबंधित सार्वजनिक प्राधिकरणांना राज्य शासन आणि केंद्र सरकारने वितरित केलेल्या निधीबाबत माहिती मिळवून;

ङ. याशिवाय माहितीचा अधिकार वापरून भ्रष्टाचाराची पुढील मोठी प्रकाराने उघडकीस आणणे शक्य झाले आहे :-

१. आदर्श गृहनिर्माण घोटाळा
२. २जी घोटाळा
३. कॉमनवेल्थ क्रीडास्पर्धा घोटाळा
४. कोळसा खंड वाटप घोटाळा
५. भारतीय रेड क्रॉस सोसायटीतील घोटाळा

**४. माहितीच्या अधिकाराचा प्रभावी वापर कसा करता येईल?**

क. संबंधित सार्वजनिक प्राधिकरणाकडे माहितीच्या अधिकाराखालील अर्ज ऑनलाईन पद्धतीने किंवा टपालाने सादर करण्याच्या माध्यमातून सार्वजनिक प्राधिकारणाकडून माहिती मिळवण्याद्वारे.

ख. असे करताना माहितीच्या अधिकाराखाली अर्ज करणाऱ्या अर्जदाराला माहितीच्या कायद्याच्या संबंधित तरतुदींचे ज्ञान असणे आवश्यक आहे.

ग. मागितलेली माहिती माहितीच्या अधिकाराखाली तरतूद करण्यात आलेल्या अपवादांच्या कक्षेत नसणे आवश्यक आहे. केवळ अशा परिस्थितीतच माहितीच्या अधिकाराखाली अर्ज सादर करणाऱ्या अर्जदाराला हवी असलेली माहिती प्राप्त करता येईल.